# धोनी, रणबीर एकत्रित



महेंद्रसिंग धोनी



रणबीर कपूर

नवी दिल्ली । दि. ३१ (वृत्तसंस्था)

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी आणि चित्रपट अभिनेता रणबीर कपूर हे पुढील महिन्यात श्रीलंकेत होणाऱ्या टी २० विश्वचषकाआधी पेप्सीच्या नव्या जाहिरातीत एकत्र दिसणार आहेत.

ही जाहिरात ज्यांना टी २० क्रिकेट आवडते त्या भारतीय युवा क्रिकेटप्रेमींना लक्षात घेऊन बनवली आहे. अभिनेता रणबीर, धोनी, विराट आणि सुरेश रैनासह टी २० च्या चाहत्यांत किती रस आहे ते दाखवतील. याविषयी रणबीर कपूर आणि अन्य क्रिकेटर स क्रिकेटर्ससोबत जाहिरातीत काम करताना खूप मजा वाटल्याची प्रतिक्रिया धोनीने दिली.

जाहिरातीच्या सुरुवातीस क्रिकेटपटूंना घेऊन एक बस जाते आणि ती गर्दीच्या ठिकाणी बंद पडते. रणबीर बसवरून वर येतो आणि क्रिकेटपटूंशी बोलणी सुरू करतो. त्यानंतर क्रिकेटप्रेमी येतात व टी २० क्रिकेट आणि त्यांच्या आवडत्या फटक्यांविषयी सांगतात.

क्रिकेटप्रेमींची अशी पद्धत पाहून धोनी अखेर रणबीरला विचारतो 'यार यांना काही पद्धत वगैरे नाही का' त्यावर रणबीर म्हणतो, 'ही टी २० आहे बॉस. पद्धत वगैरे न पाहता तो खेळला जातो.